महाराष्ट्र पोलीस
रक्षणाय खलनिग्रहणाय

मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर
जुना मुंबई पुणे रोड, आनंद कोळीवाडा मुंब्रा, ठाणे
पिन–४००६१२ दुरध्वनी क्रमांक ०२२–२५४६८३१५
e-mail-cp.thane.mumbra@mahapolice.gov.in




दिनांक : १७/११/२०२६

# प्रेसनोट

## डिजीटल अरेस्ट गुन्हयातील आरोपीतांचा तांत्रीक विश्लेषनाच्या आधारे मुंब्रा पोलीसांनी शोध घेवुन अटक करून फिर्यादी यांची संपुर्ण फसवणुक केलेली रक्कम ३५,५०,०००/-रु हस्तगत केले बाबत.

दिनांक २६/०९/२०२६ रोजी फिर्यादी राजेंद्रकुमार युधीष्ठीर नायक, वय ७१ वर्षे, धंदा सेवानिवृत्त, राहणार :- रूम नंबर १०२, ए विंग, तनवी प्लाझा, सांबेरोड, दिवा पुर्व तालुका जिल्हा ठाणे यांनी पोलीस ठाण्यात येवुन माहिती दिली की, दिनांक १६/०९/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता ते दिनांक २५/०९/२०२६ रोजी ०२:०० वाजेच्या दरम्यान अनोळखी आरोपी मोबाईल नंबर ७६५६०२४१६१, ७६५६९२६५९७ यांनी व्हॉटसअप कॉल करून '' आपका आधारकार्डसे एच.एस.बी.सी. का खाता खुला है उसमे से मनी लॉड्रींग और ०४ आंतकवादी के साथ आपका नाम है। उसमे ९६ करोड घोटाला है। उसमे से आपके अकाऊंड मे २.५ करोड रूपये आपके खाते मे डाला है। उसके लिए आपको ई.डी. डिपार्टमेंट की नोटीस भेजना है। इसके बारमे पोलीस वालो को बता तो पोलीस वाले आंतकवादी से मिले है वो उनको बताकर तुमे और तुम्हारे फॅमिली को मार डालेंगे'' अशी भिती सांगुन सुमारे ०६ तास व्हिडीओ कॉलवर बोलुन फिर्यादीस खोटी ई.डी., आर.बी.आय. , हायकोर्ट मुंबई, सी.बी.आय.ची नोटीस पाठवुन ते खरे असल्याचे भासविले. तसेच फिर्यादी दर एक एक तासाने व्हिडीओ कॉल करून त्यास रूम मध्ये बंद राहणेबाबत सांगत होते. फिर्यादी यांना सदर विभागाची भिती दाखवुन क्राईम ब्रांच, ई डीचे बनावट ऑफिसर यांनी सांगितल्याप्रमाणे इंन्डसन बॅक खात्यात ३५,५०,०००/-रु पैसे पाठविण्यास भाग पाडुन फसवणुक केली म्हणुन गुन्हा. मुंब्रा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १६४६/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कमल ३१९(२),३१८(२),३१६(२), ३३६(२),३३६(३),३३८,३४०(२),२०४,१२७(३), ६१(२), प्रमाणे दिनांक २६/०९/२०२६ रोजी १८. १६ वा. तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्हाचा तपास पोउपनिरी / अमोल सुर्यवंशी यांनी सुरू करून फिर्यादी यांनी पैसे ज्या अकाऊंटला ट्रान्सफसर केले होते त्या बॅकेशी पत्रव्यवहार करून सदरचे अकाऊंट तात्काळ फ्रिज केले.

सदर गुन्हयाचे तपासात १)अनोळखी मोबाईल नंबर ७६५६०२४१६१, ७६५६९२६५९७ क्राईम ब्रांच ऑफिसर विशाल ठाकुर, २) ई डीचे विजय कुमार 3) BOUND BUILDERS (OPC) PRIVATE LIMITED इंन्डसन बॅक खाते क्रमांक २५९३४५६२७००३ इतकी माहिती प्राप्त झाली होती.

**सदर अतिशय गंभीर गुन्हयाचे संदर्भात अनेक कार्यात्मक आणि विश्लेषणात्मक आव्हाने समोर आली,** १) गुन्हयात फिर्यादीकडुन फक्त व्हॉटसअप नंबर प्राप्त झाले होते. २) त्या व्हॉटसअप नंबरवर ई डी ऑफिसर यांचा फोटो असल्यामुळे आरोपीताचा मुळ पत्ता मिळुन शकत नव्हता.३) गुन्हयातील फिर्यादीची फसवणुक केलेली रक्कमचे फक्त इंन्डसन्स बॅक खाते क्रमांक होते. ४) सदरचे सिमकार्ड हे ओडीसा, आंध्रप्रदेश व तामिळनाडू या राज्यातुन घेतलेले होते. सदर प्राप्त माहितीचे तांत्रीक विश्लेषन करून माहिती काढून दिनांक २९/१०/२०२६ रोजी मा. अपर पोलीस आयुक्त सो, प. प्रा.विभाग, ठाणे यांचेकडुन तामिळनाडु, आंध्रप्रदेश,ओडीसा, गुजरात,या राज्यात जाण्याची परवानगी घेवुन त्याच दिवशी आंध्रप्रदेश, येथे टिम रवाना करून. त्याच दिवशी मा.अपर पोलीस आयुक्त (प.प्रा.वि.) श्री अशोक दुधे, मा.पोलीस उप आयुक्त, श्री बाळासाहेब पाटील, मा. सहा. पोलीस आयुक्त श्री संकेत देवळेकर, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री गणेश जवादवाड, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.प्रकाश वारके, सायबर सेल यांच्या मार्गदर्शनाखाली सदर आरोपीतास तपासी अधिकारी पोउपनिरी/अमोल सुर्यवंशी यांनी दिनांक ३०/१०/२०२६ रोजी ते दिनांक

Scanned with OKEN Scanner

०३/११/२०२६ रोजी तांत्रिक विश्लेषनाचे आधारे आंध्रप्रदेश येथुन **साक्षावली हुसेनपिरा शेख वय ३३ वर्षे, धंदा :- नोकरी/ व्यापार, सध्या राहणार :- आण्णा मार्केट, धर्मापुरी, ई रोड, धर्मापुरी पोलीस स्टेशन, तामिलनाडु ६३६७०१ मुळ राहणार :- ३/७९९/३, कृष्णा पुरम, ताडीपत्री, अनंतपुर, आंध्रप्रदेश ५१५४११** यास दिनांक ०३/११/२३०२६ रोजी सकाळी ०४:२० वाजता ताब्यात घेवुन त्यांचेकडे चौकशी केल्याने गुन्हा कबुली केल्याने त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. तसेच दुसरा आरोपी **समीर इकबाल डबुरीवाला वय २१ वर्षे, राहणार :- आदी खाना, पांजरीनगर मोहल्ला, फतेपुरा रोड, वडोदरा, कुंभारवाडा पोलीस स्टेशन, गुजरात पिनकोड ३९००००१** यास दिनांक ७/११/२०२६ रोजी अटक केले आहे. नमुद गुन्हयातील इतर पाहीजे आरोपीताचा शोध चालु आहे. गुन्हयातील फिर्यादी यांना त्यांची ३५,५०,०००/-रुक्कम मा.न्यायालयाचे आदेशाने फसवणुक केलेली रक्कम पुन्हा देण्यात आलेली आहे.

नमुद गुन्हयाच्या तपासात मा. पोलीस आयुक्त श्री आशुतोष डुंबरे, सह पोलीस आयुक्त श्री ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त ( पश्चिम प्रादेशिक विभाग ) श्री अशोक दुधे, पोलीस उप आयुक्त, श्री बाळासाहेब पाटील, सहा. पोलीस आयुक्त श्री संकेत देवळेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री गणेश जवादवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी पोउपनिरी/ अमोल सुर्यवंशी, पोहवा/ रघुनाथ चौधरी, पोशि/३३३३ अमित सपकाळ, पोशि/६७५७ दत्तात्रेय चव्हाण, पोशि/३०७४ जयेश चव्हाण, पोशि/ मयुर गाडे, पोशि/ समाधान माळी यांनी गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन आरोपींना तात्काळ ताब्यात घेवुन उत्कृष्ट कामगिरी करून गुन्हा उघडकीस आणलेला आहे. अधिक तपास पोउपनिरी/ अमोल सुर्यवंशी, हे करीत आहेत.

Scanned with OKEN Scanner